# परंपरा आणि काळाची गरज यांची सांगड घालून सण-उत्सवाचं सीमोल्लंघन

नुकताच हिंदू संस्कृतीतील भारतीयांच्या जीवनाला व्यापून टाकणारा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. श्रीगणेश उपासनेची परंपरा वेदकाळाइतकी प्राचीन आहे. स्वातंत्र्य चळवळीपासून सुरू झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सवात स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ७० वर्षात आमूलाग्र बदल झालेले पहायला मिळतात. ईश्वराच्या पूजनाने मानसिक समाधान मिळून आपलं पुढील आयुष्य सुख, शांती, समृद्धी, मांगल्य यासाठीच आपण देव-देवतांची पूजाअर्चा करायला हवी. परंतु सध्याचे सण-समारंभ पाहता गुढी पाडव्यासून होलिकोत्सवापर्यंत आपल्याला अनुभवायला मिळतं. हे ध्वनी-वायू-जल प्रदूषण, अस्वच्छता, पैसा आणि विजेची होणारी वारेमाप उधळपट्टी, जीवघेणी चढाओढ-स्पर्धा यातून निर्माण होणारी बीभत्सता, जातीय दंगली, गटबाजी, तरूणाईचं स्वैर वर्तन, व्यसनाधिनता, प्रतिष्ठेच्या बदललेल्या संकल्पना आणि या सर्वांतून निर्माण होणाऱ्या विविध ज्वलंत समस्या! आपल्या सणा-उत्सवांचा मूळ गाभाच आपण हरवून बसलोय असं आपल्याला वाटत नाही का?

प्रत्येक सणानंतर 'सुटलो बाबा एकदाचो' असा सुस्कारा टाकल्याची वेळ सर्वसामान्य जनतेवर आलीय. असं का बरं होतंय? याचा विचार करण्याची वेळ आता खरोखरच आलीय. आपल्या पूर्वजांनी समाजाला आवश्यक असणाऱ्या मूल्यांची जपणूक, संवर्धन होण्यासाठी ऋतुमानाप्रमाणे त्या त्या सण-उत्सवांची निर्मिती केलेली दिसते. परंतु आज ती मूल्यंच पायदळी तुडवली जाताहेत. हे वेळीच थांबवून काळानुरूप त्यात बदल करणं समाजहिताच्या दृष्टीनं अत्यंत आवश्यक आहे.

काळानुरूप आपण एकत्र कुटुंब पद्धतीतून विभक्त, विभक्त मधून हम दो हमारा एक पर्यंत मजल मारली. त्याही पुढे जावून डीआयएनके फॅमिली, विवाहाशिवाय मातृत्व, लिव्ह-इन रिलेशनशीप, अशा आधुनिक विचारसरणी समाजात झपाट्याने रूढ होताना दिसताहेत. मात्र परंपरा आणि आधुनिक विचारसरणी यांची सांगड घालण्याची मानसिकता आपल्यात दिसून येत नाही. आपण आजही कालबाह्य परंपरांना कवटाळताना दिसतोय किंवा आपल्या सोईनुसार काहीतरी पळवाटा काढून सण-उत्सव करण्यात धन्यता मानतो. उदा. वटपौर्णिमेला प्रत्यक्ष वडाच्या झाडाची पूजा अपेक्षित असताना आपण त्याच्या फांद्या तोडून पूजतो. नागपंचमी, पोळा या सणांच्या माध्यमातून प्राण्यांचं संरक्षण, संवर्धन अपेक्षित असताना त्यांच्या जीवघेण्या स्पर्धा, खेळ करतो. दहिहंडीच्या सणामधून साहस, धाडस, एकोपा या गुणांची आवश्यकता असताना आपण जीवघेण्या स्पर्धांतून अनेकांचे जीव गमावतो. हा विकृत आनंद नव्हे का? मांगल्यमय गणेशोत्सवाची अपेक्षा असताना अवाढव्य मूर्त्या बनवून विसर्जनावेळी त्यांची विटंबना करतो. प्रदूषणात भर घालतो. काही दिवसानंतर आलेल्या नवरात्रौत्सवात पारंपारिक गरब्याऐवजी सिनेमातील उत्तान, भडक गाण्यांवर ताल धरला जातो. यातूनच पुन्हा स्पर्धा, जागरणं, प्रेमप्रकरणं यांना आपणच खतपाणी घालतो. यानंतरचा दसरा खरंतर लहानथोरांना आदरपूर्वक ऐटण्याची पर्वणीच! परंतु त्यातही कालबाह्य आपट्याची पानं वाटून आपण किती मागासलेले आहोत, हेच दर्शवतो. माझं म्हणणं पटलं तर यंदा प्रत्यक्ष करून पहा. आपट्याची पानं न वाटता आंतरिक ओढीनं एकमेकांना भेटा. लहानांनी नतमस्तक, समवयस्कांनी गळाभेट यातून परस्परांबद्दल प्रेम, आपुलकी, विनम्रता, आदर दिसून येतो. नाही तर दुसऱ्या दिवशी घरभर, रस्त्यावर आपट्याची पानं पायदळी तुडवताना मनाला फार क्लेष होतात. हे कुठेतरी थांबलं पाहिजे.

याबरोबरच गल्ली बोळातून सार्वजनिक सण-उत्सव साजरे करण्यापेक्षा 'एक गाव एक उत्सव' ही संकल्पना सर्वच सणांच्या बाबतीत राबवणं हा या सर्व समस्यांवर रामबाण उपाय आहे. चलातर मग आधुनिक विचारांची घटस्थापना करून परंपरा आणि काळाची गरज यांची योग्य सांगड घालून आदर्श सण-उत्सवांचं सीमोल्लंघन करूयात.

-श्रद्धा कळंबटे,

रत्नागिरी.

मोबा. ९४२२४३०३६२